नांदेड व लातुर जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या महिलांच्या राजकीय सबलीकरणाचा चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड मानवविद्या शाखेतील 'राज्यशास्त्र' विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.)पदवी करिता संशोधन पूर्व सादर केलेला शोध सारांश

संशोधक

श्रीनिवास काशिनाथराव राठोड
(एम. ए. राज्यशास्त्र, बी. एड.)
Email- sksir22@gmail.com

मार्गदर्शक

डॉ. विश्वंबरधर्मा गायकवाड
(एम. ए. पीएच. डी. एल. एल. एम.)
राज्यशास्त्र विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक
शिवाजी महाविद्यालय, उदगीर ता. उदगीर जि. लातूर

संशोधन केंद्र
पीपल्स महाविद्यालय नांदेड,ता. नांदेड जि. नांदेड

ऑगष्ट–२०२३

नांदेड व लातुर जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या महिलांच्या राजकीय सबलीकरणाचा चिकित्सक अभ्यास

१. प्रस्तावना :

स्वातंत्रपूर्व काळापासूनच महिलांना सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी लाभलेली आहे. भारतीय स्वातंत्र चळवळीमध्येही महिलांनी मोठ्या प्रमाणत सहभाग घेतलेला आपणास दिसून येतो. भारतीय स्वातंत्र्यानंतर महिलांचा स्तर उंचावण्यासाठी विविध चळवळी, संस्था व संघटना निर्माण झाल्या त्यामुळे महिलांच्या प्रश्नावर चर्चा होऊ लागल्या शिक्षण आणि सामाजिक सुधारणेमुळे स्त्रिया सामाजिक, राजकीयद्रुष्ट्या जागृत होऊ लागल्या, सध्या महिलांच्या विकासासाठी विविध स्तरावर एकात्मिक प्रयत्न होताना दिसत आहे. महिला जर आर्थिकद्दष्ट्या स्वावलंबी झाली तर ती अनेक आव्हानांना सामोरे जावू शकते हे लक्षात घेऊन शासनाने महिला सक्षमीकरणावर लक्ष केंद्रीत केलेले आहे. तळागळातील स्त्रियाना जर राजकीय प्रक्रियेत सहभागी होता आले तरच स्त्रियांच्या जीवनात काही मूलभूत परिवर्तन घडून येने शक्य आहे. म्हणूनच लोकशाहीला बळकटी देण्यासाठी न्याय समताधिष्टीत समाजरचना प्रस्थापित करण्यासाठी स्त्रियांचा राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

२. महिला सक्षमीकरण :

महिलांचे सक्षमीरकरण म्हणजे स्त्रियांचे आध्यात्मिक, राजकीय, सामाजिक किंवा अर्थिक सामर्थ्य वाढविणे होय. त्यांना त्यांच्या क्षमतासंबंधी आत्मविश्वास विकसित करणे होय. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे, महिलांचे कार्य व ज्ञानाला अधिकृत मान्यता देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, आर्थिकद्दष्टया त्या स्वयंपूर्ण होतील यासाठी मदत करणे, त्यांना आत्मनिर्भर बनविणे, महिला संघटना सशक्त करणे आणि स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करणे होय.

१९८४-१९८९ या काळात स्त्रियांचे सबलीकरण ही संकल्पना प्रथमच मांडण्यात आली राष्ट्रीय महिला आयोग, राज्य महिला आयोग इत्यादींची स्थापना करण्यात आली. स्त्रियांवर होणा-या अन्यायाचे निराकरण करणे, निर्णय निर्धारणमधील स्त्रियांचा सहभाग वाढविणे, स्त्रियामधील आत्मविश्वास वाढविणे अशा विविध उद्दिष्टासाठी या आयोगांची निर्मिती करण्यात आली आहे. भारत सरकारने २००१ हे वर्ष महिला सबलीकरणाचे वर्ष म्हणून घोषित केले आहे. शासनाने २००१ मध्ये स्त्रियांचे सबलीकरणासाठी राष्ट्रीय महिला धोरण मंजूर केले.

३. महिलांचे राजकीय सक्षमीकरण :

भारतीय संविधानामध्ये सर्व भारतीय स्त्रियांना समान अधिकार (कलम १४) देश व राज्याकडून होणा-या भेदभावापासून संरक्षण (कलम १५ (१)) समान संधी (कलम १६) समान कामासाठी समान वेतन (कलम ३९(डी)) याची हमी दिली आहे. तसेच स्त्रिया व मुले यांच्यासाठी विशेष कायदे करण्याचा अधिकार राज्यसरकारला देण्यात आला आहे. स्त्री हक्कासंबंधी अनेक कायदे झाले असले तरी गरीब कष्टकरी स्त्री वर्गाची प्रामुख्याने कौटुंबिक व आर्थिक कुचंबणा होतच आहे. या वर्गातील स्त्रियांचा राजकारणातील सहभाग कमीच राहिला आहे. अलीकडच्या १०-१५ वर्षातील स्त्रियांचा राजकारणातील सहभाग अल्प का होईना परंतु जागृती निर्माण होत आहे आणि पूर्वीपेक्षा मोठ्या संख्येने त्या राजकारणात सहभाग घेत आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटनेद्वारे सार्वत्रिक प्रौढ मताधिकार मिळाल्यामुळे मतदानप्रक्रियेत जनतेचा सहभाग वाढलेला आहे परंतु पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना नेतृत्व करण्याची संधी मिळत नाही त्यामुळे राजकारणामध्ये पुरुषवर्चस्व निर्माण झालेले आढळून येते. भारतीय स्त्रियांचा मतदार म्हणून सहभाग चांगला असला तरी स्त्रिया स्वतंत्र विचार करून जागरुकतेने मतदान करताना दिसत नाहीत बहुतेक वेळा त्यांच्यावर कुटूंबप्रमुख पुरुषांचाच प्रभाव असतो परंतु अलीकडे स्त्रिया स्वतंत्रपणे मतदान करताना दिसून येत आहेत.

४. महिलांचा राजकीय सहभाग :

भारतातील स्त्रिया मोठ्या प्रमाणात आंदोलन व चळवळीच्या माध्यामातून राजकारणात सहभागी झाल्या आहेत. याचाच अर्थ स्त्रिया राजकीय प्रक्रियेत सक्रीयरित्या सहभागी होत आहेत. परंतु हा सहभाग स्थानिक स्तरावरच असल्याचे दिसून येतो राजकारण हे सत्ता वाटपाचा खेळ आहे आणि म्हणूनच जिथे सत्तेच्या वाटपाचा प्रश्न येतो तेथे स्त्रिया या प्रक्रियेपासून दूर राहतात. ही स्थिती बदलावयाची असेल तर स्त्रियांनी अधिकृत सहभागावर भर देणे गरजेचे आहे केंद्र व राज्यस्तरावर निवडणूक लढविण्याची संधी क्वचितच स्त्रियांना दिली जाते ज्या स्त्रियांना राजकारणात संधी दिली जाते अशा स्त्रिया मुख्यतः उच्चवर्गीय किंवा ज्यांचे नातेसबंध राजकारणीपुरुषांशी आहे अशाच असतात. महाराष्ट्र राजकारणाचा विचार केला असता १२वी विधानसभा निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या २८८ विधानसभा सदस्यापैकी केवळ ११ महिला सदस्या होत्या म्हणजेच १२ व्या विधानसमेमध्ये ३.८१ टक्के महिलांना संधी मिळाली निवडून आलेल्या ११ महिला सदस्यापैकी कॉंग्रेस ५, राष्ट्रवादी कॉंग्रेस २ भाजपा २, शिवसेना १ व शेतकरी कामगार पक्ष १ इ. महिला निवडून आल्या आहेत. सर्वसाधरणपणे ५० टक्के स्त्री

मतदार असताना फक्त ३.८१ टक्के महिलांना विधानसभेमध्ये प्रतिनिधीत्व मिळाले आहे. यावरून असे दिसून येते की आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण हेपुरुषांभोवतीच फिरत आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे महिलांचे विधानसभेमधील राजकीय प्रतिनिधीत्व पाहणे उचित ठरते.

५. भटक्या जमातीतील स्त्रीया :

भारतीय समाजात प्राचिन काळापासून स्त्रीयांच्या सामाजिक, आर्थिक, स्थीतीत सातत्याने बदल झाला आहे. आर्थिक उत्पन्नात पुरुषाबरोबर स्त्रीयांचेही फार मोठे योगदान आहे. उच्च वर्णीयाच्या तुलनेत आजही भटक्या जमातीतील स्त्रीयांचे कुटूंबासाठी आर्थिक योगदान महत्वपूर्ण असून सुध्दा आजच्या समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीला सर्वस्वी पुरुषावर अवलंबून रहावे लागते. आजही स्त्री शैक्षणिक, आर्थिक व राजकीय बाबतीत म्हणावे तेवढया प्रमाणात सक्षम झालेली दिसून येत नाही.भटक्या जमातीतील एक प्रमुख जमात म्हणून बंजारा जमातीकडे पाहिले जाते. बंजारा जमातीचा उल्लेख अतिप्राचीन असून बंजारा जमातीची एक विशिष्ट संस्कृती पहावयास मिळते. त्यांची रुढी परंपरा सण, उत्सव, लोकगीते, पोषाख, वैशिष्टयपूर्ण असे आहे बंजारा ही जमात अनेक प्रांतात वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते. जसे की, गोर, लमाणी, लांबडा आदि प्राचिन सिंध्दू संस्कृतीसी संबंधीत बंजारा संस्कृती भारतात पहावयास मिळते. महाराष्ट्रात लमाण, बंजारा, कर्नाटकात लमाणीआंध्रप्रदेशात लांबडा तर उत्तरप्रदेशात नायक अशा वेगवेगळ्या नावाने परिचीत आहे. बंजारा ही जमात गाय पुजक असून ही पारंपारीक पध्दतीनने गायीच्या पाठीवर मीठ विकण्याचा व्यवसाय करत असे, बदलत्या काळानुसार बंजारा जमात शैक्षणिक, राजकीय,आर्थिक क्षेत्रात वेगवेगळ्या पदावर कार्यरत असली तरी विकासापासून वंचीत राहिली आहे. याला बंजारा महिला अपवाद नाही. आजही बंजारा जमातितील महिला म्हणावे तेवढ्या प्रमाणात राजकीय क्षेत्रात सबल झाली आहे का? आर्थिक, शैक्षणिक बाबतीत प्रगती करत आहे का? कुटूंबातील निर्णय प्रक्रियेत तिच्या मताला किंमत आहे का? ही जाणीव या समस्याच्या मुळाशी आहे.

प्रस्तुत संशोधनात बंजारा जमातीतील महिला राजकीय सबलीकरणाचा समाजशास्त्रीय अभ्यास केला जाणार आहे. अध्ययन करताना बंजारा जमातीतील महिलांच्या सबलीकरणाचा आढावा घेऊन. बंजारा जमातीतील महिलाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थीतीचा आढावा घेतला जाईल. हा अभ्यास करीत असताना बंजारा जमातींचा इतिहास काय आहे? सबलीकरण म्हणजे नेमके काय? बंजारा जमातीतील महिलाची एकंदरीत स्थीती हे स्पष्ट करुन अध्ययनासी संबंधीत वेगवेगळ्या संज्ञा स्पष्ट केल्या जातील.

एकंदरीत संशोधनाच्या अनुशंघाने महत्वपूर्ण ठरणाऱ्या घटकांच्या आधारे प्रस्तुत अध्ययन करण्यात येणार आहे हे अध्ययन करताना बंजारा जमातीतील महिला राजकीय सबलीकरणाचे अध्ययन केले जाईल. महाराष्ट्रामधील नांदेड जिल्ह्यातील बंजारा जमातीतील महिलांच्या राजकीय सबलीकरणाचे अध्ययन करून या बंजारा स्त्रीच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक स्थीतीचा आढावा घेऊन बंजाराच्या एका वेगळया संस्कृतीचा आढावा प्रस्तुत संशोधनात घेतला जाणार आहे.

६. संशोधन समस्याची निश्चिती :

संशोधनात संशोधनाची समस्याची निश्चिती करणे ही एक अत्यंत महत्वाची बाब आहे.ज्या विषय क्षेत्रातील विशिष्ट बाब संशोधकाला समस्या वाटते किंवा ज्या बाबी संबंधी संशोधक प्रश्न उपस्थीत करतो ती विषय मर्यादा म्हणजे सामान्य विषयक्षेत्र जिज्ञासा क्षेत्र होय. या अनुषंगानेच नांदेड वलातुरजिल्ह्यातील बंजारासमाजाच्या महिलांच्या राजकीय सबलीकरणाचा चिकित्सक अभ्यासहा विषय संशोधनासाठी निश्चीत केलेला आहे. हा विषय निवडत असताना बंजारा जमातीतीलमहिलांच्या राजकीय सबलीकरणाच्या अनुषंगाने काही बाबी पुढे आल्या त्यामुळे प्रस्तुत विषय संशोधनासाठी निश्चीत केला आहे.महिला सबलीकरणाची संकल्पना सर्वप्रथम १९६० मध्ये अमेरिकेतील काळया जहालवादी गटानी मांडली या काळया गटाच्या स्त्रीयांनी म्हटले की, आम्ही स्त्रीया नाहीत का? आम्हाला अधिकार नाहीत का ? इथुनच ही विचारसरणी पुढे आली आणि स्त्रीयांच्या संदर्भात विचार करायला प्रवृत्त केले. व्यक्ती म्हणून स्त्रीयांकडे पाहून समाजात त्याचा विकास झाला पाहिजे ही विचारधारा नव्याने आली व त्या संदर्भात पावले उचलली गेली.या अनुषंगाने अलिकडच्या काळात महिला सबलीकरणाच्या संशोधनावर भर दिला जावू लागला आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधन हे नांदेड व लातुर जिल्ह्यातील बंजारा जमातीतील महिलाच्या संदर्भात विशेषत: महिलाचेसबलीकरणाच्या अनुषंगाने आर्थिकसामाजिक, शैक्षणिक स्थीतीचा अभ्यास करून बंजारा जमातीतील महिलाचे राजकीय सबलीकरण कितपत झाले आहे. याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला जाणार आहे.

७. संशोधनाची व्याप्ती :

सामाजिक संशोधन करित असताना लक्षात घ्यावे लागते की, कोणत्याही समस्याच्या समग्राचा अभ्यास करणे अशक्य असते. यात मोठ्या प्रमाणात श्रम, वेळ, पैसा खर्च होत असतो.

यातून वस्तुनिष्ठ संशोधन, किंवा सिध्दांत मांडण्यात आडचणी येत असतात. कारण संपूर्ण घटकांचा अभ्यास करण्यासाठी भरपूर कालावधी लागत असतो. संशोधनाची रुपरेषा ठरवावी लागते. यात प्रामुख्याने संशोधनाची व्याप्ती संशोधनाचा कालावधी निश्चीत करणे गरजेचे असते.

प्रस्तुत अध्ययन करताना संशोधनाची व्याप्ती निश्चीत करण्यात आली आहे. या संशोधनाची व्याप्ती ही नांदेड वलातुरजिल्ह्यापुरतीमर्यादित आहे.

नांदेडवलातुरजिल्हयातील सर्वच बंजारा जमातीतील महिलांकडून माहिती मिळविणे अशक्य व गैरसोयीचे होईल. हे लक्षात घेवून नांदेडव लातुरजिल्हयातीलसव्वीसतालुक्यातील व्यवस्थाबध्द नमुना निवडपद्धतीनेलोकसंख्याच्या प्रमाणात १०४०बंजारा जमातीतील महिलां उत्तरदात्याचीच निवड केली जाणार आहे. व त्यांच्या कडून मुलाखत अनुसूची मध्ये माहिती भरुन घेतली जाईल.

७.१. संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत अभ्यास भौगोलिकदृष्ट्या नांदेड व लातुरजील्ह्यापुरताच मर्यादित आहे. बंजारा विमुक्त जमातीतील एकूण १०४०उत्तरदात्यांची मुलाखत घेण्यासाठी निवड केली जाणार आहे. त्यामुळे सदरील समग्राचे (विश्वाचे) एकूण स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता यातील निवडलेल्या उत्तरदात्यांची संख्या देखील मर्यादितच केली जाणार आहे. ज्यांची उत्तरदाते म्हणून निवड करून त्यांची मुलाखत घेतली जाईल. ते सर्वत्र महिला उत्तरदाते आहेत यामध्ये बंजारा जमातीमधील पुरुष उत्तरदात्याचा समावेश नाही.

८. संशोधन विषयाचे महत्व :

प्रस्तुत संशोधनातमहिलांचा राजकीय, सामाजिक, आर्थिक विकास व्हावा, महिलांना समानतेने सर्व बाबीवर जीवन जगता यावे हाचएक महत्वपूर्ण दृष्टिकोण डोळयासमोर ठेवून संशोधन केले जाणार आहे.

प्रस्तुत संशोधन हे बंजारा महिला राजकीय सबलीकरणाच्या अनुषंगाने आहे, आधुनिक काळात भारतीय स्त्रीयांचा मोठया प्रमाणात विकास होत आहे, परंतु यामध्ये सर्वच घटकातील महिलांचा विकास होतो आहे असे नाही. आजही काही जमाती विकासापासून कोसो अंतर दूर आहेत. त्यांच्यापर्यंत विकासाच्या कोणत्याही सेवासुविधा पोहचल्या नाहीत. परिणामी आजही महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण पुरुषाच्या तुलनेत खूपच कमीच आहे. बंजारा जमातीमधील

शिक्षणाचे प्रमाण कमी असल्या कारणाने त्यांचा सामाजिक, शैक्षणिक राजकीय विकास तुलनेने कमी झालेला आहे. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास झालेला नाही. त्यांच्यामध्ये आजही सबलीकरणाची प्रक्रिया रुजली नाही. विशेष करुन बंजारा पुरुषाच्या तुलनेत स्त्रीयांचे शैक्षणिक प्रमाण कमी आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधातनांदेड व लातुर जिल्ह्यातील बंजारा जमातीमधील महिलांच्या राजकीय सबलीकरणाची प्रक्रिया कोणत्या स्वरुपाची आहे या संबधाने संशोधन केले जाणार आहे. त्यामुळे हे संशोधन बंजारा जमातीच्या महिलांसाठी महत्वपूर्ण ठरते. या संशोधनामुळे बंजारा जमीतीमध्ये महिला सबलीकरणाच्या संकल्पने बाबत जाणिव आहे किंवा नाही याबदल माहिती होण्यासमदत होईल त्याच बरोबर बंजारा जमातीमध्ये महिला सबलीकरणाच्यासाठी आवश्यक असणाऱ्या शासनाच्या विविध योजना बंजारा जमातीमध्ये महिलांना माहित होण्यास मदत होणार आहे.

प्रस्तुत संशोधनात बंजारा जमातीमधील स्त्रींयाची कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय स्थीती समजण्यास मदत होणार आहे. एकंदरीत या संशोधनाचे महत्व बंजारा जमातीच्या महिलांच्या संदर्भात महत्वपूर्ण ठरेल असे वाटते. प्रस्तुत संशोधन हे बंजारा महिलांच्या विकासात्मक दृष्टीकोनातून वा सबलीकरणाच्या अनुषंगाने महत्वपूर्ण आहे.

९. संशोधनाचे उद्दीष्टे:

१. महिला सबलीकरणाची संकल्पना जाणून घेऊन बंजारा जमातीतीलस्त्रीयांच्या राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.

२. बंजारा जमातीतील महिलांच्या राजकीय विकासात सामजिक व शैक्षणिक स्थीतीच्या परिणामाचा अभ्यास करणे.

३. बंजारा जमातीतील महिलांच्या राजकीय विकासात आर्थिक स्थीतीच्या परिणामाचा अभ्यास करणे.

४. बंजारा जमातीतील स्त्रीयांच्याकौटुंबिक, धार्मिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.

५. बंजारा जमातीतील स्त्रीयांचे प्रश्न व समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

१०. संशोधनाचे गृहितके :

१. बंजारा जमातीतील महिलांचे राजकीय क्षेत्रात पुरुषांच्या प्रमाणात प्रतीनिधित्व अल्प प्रमाणात दिसून येते.

२. बंजारा जमातीतील महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा खालावलेला दिसून येतो.

३. बंजारा जमातीतील महिलांचे शैक्षणिक प्रमाण कमी आहे व त्यांच्यावर प्रथा, परंपरा, जातीचा पगडा आहे.

४. बंजारा जमातीतील महिलांना शासकीय योजना, सामाजिक कायदे याबाबतचे अज्ञान आहे.

५. बंजारा स्त्रीवर प्रथा, परंपरा, जातीचा पगडा असल्यामुळे कुटुंबातील निर्णय निर्धारणात त्याना दुय्यम स्थान आहे.

११. संशोधनाचे क्षेत्र :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन क्षेत्र म्हणून संपूर्ण नांदेड व लातुरजिल्ह्याची निवड संशोधन विश्व म्हणून केली आहे आणि संशोधनाचे एकक म्हणून नांदेड व लातुरजिल्ह्यातील बंजारा महिलांची निवड करण्यात आली आहे.

१२. संशोधन पध्दती :

सामाजिक संशोधन करित असताना संशोधन पध्दतीची भूमीका महत्वाची असते. शास्त्रीय संशोधन केल्यामुळे समस्याची उकल करून क्रमबध्द पध्दतीने अध्ययन केल्यामुळे तथ्य संकलीत करता येतात. नवीन तथ्याचा शोध घेवून तथ्य संकलीत करता येतात. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनात साधारणपणे वस्तुनिष्ठ माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण पध्दती वापरली जाते. याच अनूशंगाने बंजारा जमातीतील महिलांच्या राजकीय सबलीकरणाचाअभ्यास करण्यासाठी सामाजिक सर्वेक्षण ही पध्दत वापरण्यात येणार आहे.

१३. समाजशास्त्रीय संशोधन :

सामाजिक संशोधन करीत असताना संशोधन पध्दतीची भुमीका महत्वाची असते. कोणत्याही अभ्यास विषयाचे मिळविलेले शास्त्रशुध्द आणि सुसंबंध ज्ञान हे मुलभूत तत्वाच्या कसोट्यावर तपासून पहावे लागते. या कसोटया शास्त्रीय पध्दतीच्या अधिष्ठानात आहेत. संशोधकाने प्राप्त केलेल्या ज्ञानाची आणि तथ्याची प्रमाणीकता या कसोटयावर तपासली जाते. शास्त्रीय पध्दतीचा वापर केल्यामुळे समस्याची उकल होत असते. संशोधन पध्दतीचा वापर केल्याने संशोधनात तथ्य संकलीत करता येतात आणि यातूनच संशोधनाचा हेतू साध्य करता येतो. या दृष्टिनेच प्रस्तुत संशोधनामध्ये बंजारा जमातीतील महिला राजकीय सबलीकरणाचा अभ्यास करीत असताना काही तथ्य शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे व तथ्यसंकलनाच्या

आधारे प्राप्त केलेल्या विषयाच्या संबंधीत मिळविलेल्या माहितीचे पध्दतशीर विश्लेषण केले जाणार आहे.

१४. संशोधन आराखडा.

आराखडा म्हणजे करावयाच्या अभ्यासाची योजना होय.आराखडयाच्या संदर्भात रसेलडी. असे म्हणतात "ज्या बाबी प्रत्येक्षात उतरावयाच्या असतात त्या उतरवण्याच्या पुर्वीच त्या संबंधी निर्णय घेण्याची प्रक्रिया म्हणजेच संशोधन आराखडा होय. संशोधन आराखडयाची वेगवेगळे प्रकार आहेत त्याच प्रामुख्याने आन्वेशनात्मक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक, प्रयोगात्मक संशोधन आराखडा हे प्रमुख प्रकार आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखडयाचा वापर केला जाणार आहे.

१४.१. वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखडा.

वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उद्देश एखादया समस्या संबंधी असलेल्या वास्तवीक तथ्याच्या आधारे वर्णनात्मक विवेचन करणे हे असते. तथ्य संकलीत करण्याचा उद्देश लक्षात घेवून त्या तथ्याच्या आधारे संशोधकाने संशोधनाचा आराखडा विकसीत केला जातो. आशा प्रकारे तथ्याधिष्ठीतमाहितीच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय.वर्णनात्मक संशोधन आराखडयाद्वारे माहितीचे वर्णन केले जाणार आहे.

प्रस्तुत संशोधनात बंजारा जमातीतील महिलाचे राजकीय सबलीकरण या अनुशंघाने अध्ययन केले आहे. बंजाराचा इतिहास, जमात, सबलीकरण, बंजारा महिलाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय जीवन या संदर्भात वर्णनात्मक संशोधन आराखडयाच्या माध्यमातून अध्ययन केले जाणार आहे तसेच नमुना म्हणून निवडलेल्या बंजारा महिलांकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेशणात्मक पद्धतीने मांडण्यात येणार आहे.

१५. नमुना निवड पध्दती :

प्रस्तुत संशोधनात प्रामुख्याने साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचावापर करून नांदेडव लातुरजिल्हयात एकूण २६ तालुके आहेत.प्रत्येक तालुक्यातून ४० बंजारा महिलांची म्हणजे एकूण १०४०बंजारा महिला उत्तरदात्यांची निवडकेली जाणार आहे.

१६. तथ्य संकलनाची स्त्रोत :

१६.१ प्राथमिक तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक तथ्य संकलनातील मुलाखत अनुसूचीचा वापर केला जाणार आहे. नांदेड व लातुरजिल्हयातूनव्यवस्थाबध्द नमुना निवडीच्या आधारे निवडलेल्या उत्तर दात्याकडून मुलाखत अनुसूची भरुन घेतली जाईल. या शिवाय मोबाईल कॅमेरा, फोटो कॅमेरा, टेपरेकॉर्डर इ. चा वापर करण्यात येईल.

१६.२ दुय्यम तथ्य संकलन :

दुय्यम स्त्रोत म्हणून प्रस्तुत विषयाशी संबधीत लिखीत दस्तावेज संदर्भग्रंथ मासीके, विविध अहवाल आकडेवारी, वृत्तपत्र, इंटरनेट वरील संशोधनासाठी वापरण्यात येणारी वेगवेगळी संकेत स्थळे इत्यादीचा वापर करुन तथ्य संकलीत केली जाणार आहेत.

१६.३. मुलाखत अनुसूची :

संशोधनात तथ्य संकलनाचे एक प्राथमिक साधन म्हणून मुलाखत पध्दतीचा उपयोग केला जातो. संशोधन करताना मुलाखत अनुसूची मध्ये उत्तरदात्यांना तयार केलेल्या प्रश्न मालिकेत प्रश्न विचारुन अनुसूची भरुन घेतली जाणार आहे. अशा प्रकारच्या अनुसूची द्वारे नांदेडव लातुरजिल्ह्यातील सर्व तालुक्यातील व्यवस्थाबध्द नमुना निवडीच्या आधारे निवडलेल्या १०४०उत्तरदात्याकडून माहिती मिळवीली जाणार आहे. त्यात ग्रामीणवशहरी भागातील बंजारा जमातीतील महिला याप्रमाणे एककाची निवड केली जाणार आहे. त्या द्वारे त्याची वयक्तीक माहिती व विषयाच्या अनुशंघाने माहिती संकलीत केली जाईल. मुलाखत अनुसूची तयार करताना अचूक वस्तुनिष्ठ माहिती मिळावी या दृष्टीकोनात योग्य प्रश्नाची निवड केली जाणार आहे. जेणेकरून प्रस्तुत संशोधन दर्जेदार बनण्यास मदतहोईल.

१७. तथ्याचे विश्लेषण :

सामाजिक संशोधनामध्ये ज्ञात करुन घेतलेल्या घटनेची पुन्हा पुन्हा पडताळणी करुन नविन ज्ञानाचा शोध घेतला जातो. प्रस्तुत संशोधनात तथ्याचे वर्गीकरण करून संख्यात्मक विश्लेषण करता यावे यासाठी उत्तरदात्यानी दिलेल्या माहितीचे सांकेतीकरण करण्यात येणार आहे. संशोधन करित असताना प्राथमिक व दुय्यम तथ्याच्या आधारे माहिती संकलीत केली जाऊन. त्यानंतर संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण आणि वर्गीकरण केले जाते. याच अनुशंघाने त्याचे सारणीयण केले जाते व त्या आधारे निष्कर्ष काढले जातात. तथ्य विश्लेषणामुळे तथ्यांना अर्थ प्राप्त होतो व तथ्याच्या विश्लेषनामुळेच तथ्यांना अर्थ प्राप्त होतो.

१८. पुर्वलिखीत साहित्याचा आढावा :

१८.१. शुभांगी गोटे, (२००४) महिला सबलीकरण स्वरुप व समस्या :

या ग्रंथाची मांडणी करताना एकूण बारा प्रकरणात विभागणी केली आहे. यात महिला सबलीकरणाच्या बाबतीत अर्थपूर्ण आशी माहिती दिली आहे. या महिला सबलीकरणा संदर्भात असे मत प्रतिपादन करतात की, समाजात स्त्रीयांना आर्थिक सत्ता व अधिकार नसेल आणि त्या पतीवर किंवा वडीलावर बहुतांशी किंवा पूर्णपणाने आर्थिकदृष्टया अवलंबून असतील तर पुरुष स्त्रीयावर सर्वगामी नियंत्रण ठेवतात त्यामुळे स्त्रीया रोजगाराभिमुख होणे गरजेचे आहे. स्त्रीया आर्थोत्पादन करणाऱ्या झाल्या की,त्यांचा घरातील आणि समाजातील आवाज प्रतिमा आणि स्थान वाढते. स्वातंत्र्याचा अनुभव घेता येतो आणि आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची समान संधी मिळते.भारतीय स्त्रीयाच्या दर्जा एक तुलनात्मक अभ्यास करताना जॉन समुल यांनी याबाबत वास्तव चित्र मांडले आहे.

१८.२. चौगुले सुमती, (२००५) महिला सबलीकरणाची दिशा :

प्रस्तुत ग्रंथात महिला सबलीकरणा संबंधी एकूण सात प्रकरणात विभागणी करण्यात आली आहे. यात महिला सबलीकरणाची संकल्पना स्पष्ट केली आहे. यामध्ये महिला सबलीकरणाची सुत्रे मी कोण ? माझा जन्म कशासाठी त्याच बरोबर मानव जन्माची कहाणी श्रेष्ठ कोन स्त्री की पुरुष ? संघर्षाचा सुत्रधार कोण ? समाज की परिस्थिती न्याय देवतेची न्यायासाठी हाक व आपण सारेच आनंदयात्री अशा प्रकरणाचा समावेश करुन महिलाच्या सबलीकरणा संबंधी सविस्तर आढावा प्रस्तुत ग्रंथात घेतला आहे. तसेच स्त्री सबलीकरणाची सुत्रे व स्त्रीशक्ती जागृतीची गरज ही काव्यात्मक स्वरुपात अतिशय सुंदर रितीने मांडण्यात आली आहे.

१८.३. बी. पाटील, (१९७३) बंजारा लोकाचा इतिहास:

या ग्रंथात विषयाची मांडणी करताना "बंजारा समाज हा एक ऐतिहासिक समाज आहे. काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत भारतातील सर्वच राज्यात दूर पहाडाच्या टोकावर व पायत्याच्या दऱ्याखोऱ्यात धनदाट जंगलात आणि निसर्गाच्या सानिध्यात, सुधारीत व सुसंकृत समाजापासून कोसो दूर असणारा आपली गोरपंचायत, भिन्न रहाणीमान, स्वतंत्र बोली भाषा (गोरबोली) भिन्न संस्कृती तांडा संस्कृती, देशातील हजारो तांडा वस्ती, वाडया बस्ती, नगला, जुग्गी बंजारा शब्दांची उत्पत्ती नमूद करताना "बंजारा या शब्दामध्ये वन+ज+अरी अशा तीन शब्दाचा समावेश होतो. उर्दूमध्ये बंजाराशब्दाचा अर्थ पडीत जमीन व मराठीतही या शब्दाचे स्वरूप बंजार असे

झाले आहे. म्हणून पडीत जमीनीवर उपजिवीका करणारे लोक असाही याचा अर्थ झाला आहे. बंजाराचा पडीक जमीनीशी नेहमीच व निकटचा संबंध आहे. भटकेहा शब्द नोमेडू या इंग्रजी रुपांतर आहे. नोमेड म्हणजेच पुशपालक असा होतो. या ग्रंथात बंजारा जमातीचा उदय आणि विकास स्पष्ट केला आहे. त्या प्रामुख्याने असा उल्लेख आहे कीऐतिहासीक दृष्टया युध्द, दुष्काळ, परकियआक्रमणे अशा कठीण परिस्थितीचा सामना करीत हे लोक राज्यस्थान सोडून बाहेर जाणाऱ्या समुहामध्ये गोर नावाचा जाती समुह होता त्यावरुन बंजारा जमातीच्या समुहाला गोरमाटी हे नाव पडले आज बंजारा स्वतःला गोर (श्रेष्ठ) मानतो. संपूर्ण भारतात या समाजाला प्रामुख्याने बंजारा, ब्रिजारी, लमाण, खुगाली, लमानी इ. अनेक नावने स्थान परत्वे ओळखतात.बंजारा जमात ही एक ऐतिहासीक जमात आहे. या समाजाच्या राहणीमान, सन-समारंभ, व्यावसाय समाजाच संवैधानिक स्थान, त्यांच्या विस्थापनाची ऐतिहासीक पार्श्वभूमी त्याचे सामाजिक, आर्थिक, राजकिय जीवनाचा आढावा प्रस्तुत ग्रंथातून घेतला आहे.

१८.४. गोविंद राठोड, (२००२) स्वातंत्र्योत्तर बंजारा समाजाचे प्रबोधन: एक अभ्यास :

प्रस्तुत संशोधन प्रबंधाची ५ प्रकरणात मांडनी केली आहे. सदरील प्रकरणात स्वातंत्र्योत्तर काळातील बंजारा समाजावरील झालेल्या प्रबोधनाचे अध्ययन केले आहे. यात बंजाराची लोकसंस्कृती स्वरुप आणि त्याची वौशिष्ट्ये त्याच बरोबर बंजाराच्या संस्कृतीचे अध्ययन करुन त्याच्या संस्कृतीचे विशेष सांगीतले आहेत.

प्रस्तुत संशोधनात चार जिल्हे हे महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या घटनेनुसार सर्वसाधारण ओळखले जातात या जिल्हयातील प्रामुख्याने किनवट, भोकर, औंढा, रेणापूर, गंगाखेड हे बंजारा समाजाची दाट लोकवस्ती असलेले तालुके ओळखले जातात या प्रबंधात चार जिल्हयातील लातूर, परभणी, नांदेड, बीड ही चार प्रभाग निश्चीत करून त्याचा अभ्यास केला आहे. अभ्यासाअंती सात प्रकरणाची मांडणी करुन पहिल्या प्रकरणात संशोधन समस्याचे नाव परिभाषा, शिक्षणाच्या व्याख्या, शैक्षणिक धोरणे त्याच बरोबर पायाभूत घटकावर चर्चा केली आहे. दुसऱ्या प्रकरणात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील बंजारा समाज संस्कृतीच्या उत्पत्तीचा आढावा घेण्यात आला आहे यात बंजरा लोकसंस्कृती, संस्कार, विधी, धार्मीक विधी, सण, उत्सव, लोकश्रध्दा, लोकसमजूती, लोककथा, लोकगीते, गोरबोली, वेशभुषा इत्यादींचा आढावा घेण्यात आला आहे. त्यानंतर बंजारा समाजाच्या प्रबोधनात विविध क्षेत्रातील व्यक्तीचे योगदान यावर चर्चा करण्यात आली आहे. या प्रबंधात काही निष्कर्ष मांडली आहेत ते पुढीलप्रमाणेसमाज परिवर्तनाला लागलेली दिशा, सुधारणाविषक चळवळ, दृष्टिकोनात होत

असलेला बदल, ज्ञानाबद्लची सखोलता इ. बाबतीत प्रबोधन घडून येत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील या समाजाचे प्रबोधन सर्व क्षेत्रामध्ये सर्वाधीक व त्या तुलनेत साहित्य क्षेत्रात सर्वात कमी असल्याचे निदर्शनास येते. बंजारा समाजामध्ये प्रबोधनात अडसर ठरलेल्या बाबी पुढील प्रमाणे नोंद करता येईल. उदा. भटकंती, गुन्हेगारी, प्रथापरंपरा, अज्ञान, उदासीनता, निरक्षरता, दारिद्रय. या प्रकारची मांडणी प्रस्तुत संशोधनात केली आहे.

१८.५. राठोड (२००१) महराष्ट्रातील बंजारा समाजाचे अर्थशास्त्र.(अप्रकाशित शोधप्रबंध) :

प्रस्तुत प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास सादर केला आहे. प्रस्तुत प्रबंधाची एकूण सात प्रकरणात मांडणी केली आहे. या संशोधनात बंजारा समाजाचा इतिहास, गुन्हेगारी जमाती कायदयाचा ऐतिहासीक आढावा, बंजारा समाजाची व्यवस्था राहणीमान, बंजारा समाजाची सरंचना, राजकिय, सामाजिक बाबींचा आढावा घेवून भौगोलीक परिस्थितीचा ही अभ्यास या प्रबंधात केला आहे. या सर्व घटकांचे अध्ययन करून कांही महत्वपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत. याचा ही आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. उत्तर भारताच्या तुलनेत दक्षिण भारतात बंजारा समाज संख्येने अधिक आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा खानदेश विदर्भ या प्रातांत बंजारा समुदाय संख्येने अधिक आहे. तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात कमी आहे. या संशोधनातून असे निष्कर्ष काढले आहे की, महाराष्ट्रातील एकूण तांडयापैकी ७५% तांडयाचे स्थलांतर होते. लातूर, जळगाव, अकोला, नांदेड, बीड जिल्हयातून अधिक तांडे रोजगारांसाठी स्थलांतरीत होता. १७% तांडे सपाट भुप्रदेशावर आहेत. एकूण बंजारा समाजातील जवळपास २१% लोकसंख्या कृषीवर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील एकूण तांडयापैकी जवळजवळ ७१% तांडयावर शाळा फक्त ४ थी पर्यंत आहे, यात जिल्हा परिषद शाळेचे प्रमाण जास्त आहे. बंजारा जमातीतील मुलांचे आणि मुलींचे तालुक्याच्या आणि जिल्हयाच्या ठिकाणी शिकण्याचे प्रमाण इतर समाजापेक्षा कमी आहे. या समाजात दुग्ध व्यवसाय करण्याचे प्रमाण अधिक आहे. बंजारा समाजातील केवळ ३.१५% लोकांना वसंतराव नाईक विकास महामंडळाच्या कर्ज वाटपाचा फायदा झाला आहे.

१९. सारणीकरण :

प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्य संकलनात तथ्याचे वर्गीकरण, गटातील एककाची मोजणी व विश्लेषण करुनच काढले जाणार आहेत. त्याच बरोबर कोष्टकातील माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करताना सांखिकीय साधने म्हणून गुणाकार, भागाकार, बेरीज इत्यादी सांकेतिक

घटकांचा वापर केला जाणार आहे. दोन चलातील सहसंबंध जाणून घेण्यासाठी परस्पर छेदन सारणीचा वापर करून मिळालेल्या तथ्याचे विश्लेषण करुनच संबंधीत घटकांच्या संदर्भात विश्लेषण काढले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने बंजारा जमातीतील महिलाची, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थीतीचा आढावा घेतला जाणार आहे.

२०. अहवाल लेखन :

नांदेड व लातुर जिल्ह्यातील बंजारा महिलांचीमाहिती संकलीत करण्यासाठी अनुसूची तयार करुन व्यवस्थाबध्द नमुना निवडीच्या आधारे १०४०उत्तरदात्याकडून माहिती भरुन घेऊन त्या वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे सारणी तयार करुन सारणीच्या आधारे, अहवाल लेखन केले जाणार आहे. सदरील अहवाल सैध्दांतीक व व्यावहारीक दृष्ट्या संशोधन निष्कर्षांना असणारे महत्व हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून या प्रबंधात अहवाल लेखन केले जाणार आहे.

२१. प्रकरणाची मांडणी :

प्रकरण पहिले : प्रस्तावना.

प्रकरण दुसरे : संशोधन पध्दती संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : बंजारा जमातीतील महिलांचे ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण चौथे : बंजारा जमातीतील महिलांचे शैक्षणिक, आर्थिक व राजकिय जीवन.

प्रकरण पाचवे : बंजारा जमातीतील महिलांचे सबलीकरण

प्रकरण साहवे: निष्कर्ष आणि शिफारसी.

संदर्भ सूची :

१.नांगोडे, गुरुनाथ. १९८६, सामाजिक संशोधन पध्दती फडकेप्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ ३६.
२. बोधनकर, सुधीर, अलोणी, विवेक. २००७, सामाजिक संशोधन पध्दती,श्री साईनाथ प्रकाशन नागपूर. पृष्ठ.०६.
३. कराडे, बी. एम. २०००, शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर पृष्ठ. १०.
४.सोमण, मा. शा. १९८४, सामाजिक संशोधनाची तंत्रे,विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे, पृष्ठ.०१.
५.भांडारकर, पु. ल. १९८७, सामाजिक संशोधन पध्दती,महाराष्ट्रग्रंथनिर्मीती मंडळ, नागपूर पृष्ठ.३०
६. गोटे, शुभागी. २००४, महिला सबलीकरणः स्वरुप व समस्या वरद पब्लिकेशन औरंगाबाद.
७. चौघुले, सुमती, २००५, महिला सबलीकरणाची नवी दिशा, इंदुजा प्रकाशन, अमरावती. पृष्ठ.२९
८. पाटील, १९७३, बंजारा लोकांचा इतिहास, प्रकाशक बळीराम पाटील स्मारक समिती, यवतमाळ व शामब्रदर्स सुभाष रोड नागपूर.
९. राठोड, गोविंद. २००२, स्वातंत्र्योत्तर बंजारा समाजाचे प्रबोधन एक अभ्यास. अप्रकाशित पीएच.डी. प्रबंधडॉ. बा. आ. म. वि. औरंगाबाद. पृष्ठ.१२६
१०. चव्हाण, यशवंत. २००९, बीड जिल्हयातील बंजारा समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध डॉ. बा. आ. म. वि. औरंगाबाद पृष्ठ. १२

संशोधक
श्रीनिवास काशिनाथराव राठोड
(एम. ए. राज्यशास्त्र, बी. एड.)
Email- sksir22@gmail.com

मार्गदर्शक
डॉ. विश्वंबरधर्मा गायकवाड
(एम. ए. पीएच. डी. एल. एल. एम.)
राज्यशास्त्र विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक
शिवाजी महाविद्यालय, उदगीर ता. उदगीर जि. लातूर